# उमेदवारांना सुचना

1. दिनांक 26/11/ 2019 रोजी अल्पसुचीमध्ये नांव असलेल्या उमेदवारांनी दिनांक 27/11/2019 ते दिनांक 02/12/2019 (सुट्टीचे दिवस वगळुन) या कालावधीत कार्यालयीन वेळेमध्ये पासपोर्ट साईजच्या फोटोसह शैक्षणिक कागदपत्रांच्या सत्यप्रती, फोटो ओळखपत्र जसे, आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन परवानाची प्रत, शासन विहित करेल त्या प्राधिका–याने दिलेला जातीचा दाखला, जेथे लागु असेल तेथे, कुटुंब लहान असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (नमुना अ) जोडावा, उमेदवार शासकीय सेवेत असल्यास, विभागाचे ना–हरकत प्रमाणपत्र जोडावे, जन्मतारखेचा पुरावा (उदा. शाळा सोडल्याचा दाखला, 10 वी चे सनद, जन्म प्रमाणपत्र इत्यादी) दाखल करावा व ओळखपत्र प्राप्त करुन घ्यावे.

2. ओळखपत्र असल्याशिवाय चाळणी परिक्षा व इतर परिक्षेला बसण्यास परवानगी मिळणार नाही.

3. दिनांक 08/12/2019 रोजी सफाईगार पदासाठी 20 गुणांसाठी मुल्यमापन चापल्य व साफसफाई परीक्षा सकाळी 10–00 ते दुपारी 02–00 वाजे दरम्यान घेण्यांत येईल.

4. सफाईगार पदासाठी तोंडी मुलाखती करिता पात्र उमेदवारांची यादी, मुलाखतीच्या वेळापत्रकासह, जिल्हा न्यायालयाच्या सुचना फलकावर व संकेत स्थळावर दिनांक 10/12/2019 रोजी लावण्यात/प्रसिद्ध करण्यात येईल. अशा उमेदवारांची संख्या जाहिरात दिलेल्या पदसंख्येच्या तिपटीपेक्षा जास्त नसेल. 1 :3 असे प्रमाण राखण्याकरिता अल्पसुचिबद्ध (Short-list) केलेल्या शेवटच्या उमेदवारांस प्राप्त झालेल्या गुणाएवढेच गुण एकापेक्षा जास्त उमेदवरास प्राप्त झाल्यास, अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल.

आदेशान्वये

प्रबंधक

दिनांक :– 26/11/2019

जिल्हा न्यायालय, जालना